# ‘जीएसटी’च्या समस्येत भर

*भारतातील सेवा व वस्तू कर केवळ निवडणुकीच्या क्लृप्तीपलीकडेही जाईल का?*

भारतामध्ये जुलै २०१७ मध्ये वस्तू व सेवा कर लागू झाला आणि तेव्हापासून या कराच्या अंमलबजावणीतील गुंतागुंतीमुळे चारशेहून अधिक आदेश व अधिसूचना काढाव्या लागलेल्या आहेत. आता २०१९ सालच्या सार्वत्रिक निवडणुका दृष्टिक्षेपात आल्यामुळे भारतीय जनता पक्ष (भाजप) व विरोधातील काँग्रेस पक्ष हे दोघेही आणखी काही सुधारणांच्या आणाभाका घेत आहेत. एकूण ४० ढोबळ प्रकारांच्या यादीतील २३ वस्तूंवरील जीएसटी कर भाजप सरकारने १८ टक्क्यांवर किंवा त्याहून खाली आणला आहे. दरम्यान, अधिक व्याप्ती असलेली (प्रत्येक वस्तू अनुसार अंमलात येणारी) सोपी कररचना आपण अमलात आणणार असल्याचं आश्वासन काँग्रेसने २०१९ सालच्या निवडणुकीय जाहीरनाम्यात दिल्याचं माध्यमांमधून प्रसिद्ध झालं आहे. जीएसटी २.० स्वरूपाच्या या रचनेतही एकाच करामध्ये सगळं सामावण्याचा प्रयत्न होईल. परंतु, जीएसटीमधील कथित मूलभूत गुंतागुंत या (अंमलात आलेल्या वा आश्वासित असलेल्या) सुधारणांनी सुटेल का किंवा कशी सुटेल, हे अजूनही अस्पष्ट आहे. भारतातील वित्तीय संघराज्यप्रणाली, नियमपालन आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे असंघटित क्षेत्रातील उद्योग वा लघुभांडवल यांचं भवितव्य, अशा काही गंभीर मुद्द्यांबाबतचे विविध प्रश्न अजून अनुत्तरित राहिलेले आहेत.

करसुधारणांचा वापर निवडणुका लढवण्यांसाठी करण्यात काहीच नवीन नाही. महसुलातील एक पंचमांश भाग व्यापणारे कर असले तरीही लोकांचा रोष निवळवण्यासाठी असे कर मागे घेण्याचं पाऊल सरकारं बेधडकपणे उचलतात, हे अलीकडेच मलेशियात दिसून आलं. भारतामध्ये जीएसटी ‘मागे घेतला तर’ त्यासाठी धक्कादायक किंमत मोजावी लागेल. प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या आत्ममग्नतेमध्ये (जीएसटीचा ‘धाडसी’ अंमलबजावणीकर्ता किंवा ‘अभिनव’ संकल्पना मांडणारा) त्यातल्यात्यात एकच बाब थोडी समाधानाची आहे, ती म्हणजे कर मागे घेण्याचा दावा कोणी केलेला नाही. पण, समांतरपणे राज्यव्यवस्थेच्या संघराज्यीय रचनेला यातून धोका उत्पन्न होऊ शकतो.

आर्थिक व्यवहारांसंदर्भातील काँग्रेसचे प्रवक्ते गौरव वल्लभ यांनी अलीकडेच अशी टिप्पणी केली की, जीएसटी(२.०)साठी घटनादुरुस्ती गरजेची नाही, कारण आवश्यक दुरुस्त्या करण्याचे अधिकार जीएसटी मंडळाला आहेत. राज्यांच्या वित्तीय स्वायत्ततेसाठी केलेल्या वैधानिक तरतुदींची उपेक्षा करणारा हा सूर आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारने अशीच वृत्ती दाखवली. विविध राज्यांमधील आर्थिक वास्तव आणि समस्या बऱ्याच भिन्न आहेत, हे आपण विसरता कामा नये. वीज, स्थावर मालमत्ता व पेट्रोलियम यांना जीएसटीच्या कक्षेत आणणं पंजाबसाठी लाभदायक ठरू शकेल आणि वस्तू व सेवांसाठी या राज्यात सामायिक रचना उभारली जाऊ शकते, पण इतरत्र अशीच परिस्थिती असेल असं नाही.

हिंदी पट्ट्यातील तीन राज्यांत २०१८मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला विजय मिळाला, त्यामुळे जीएसटी मंडळाच्या सत्तारचनेमध्येही

फेरफार झाले– काही प्रमाणात भाजप व रालोआ यांच्या विरोधात हे मंडळ कललं आहे. पण केवळ या बदलामुळे जीएसटी रचनेचा कायापालट करण्याचा दावा अवाजवी आशादायी आहे. काँग्रेस २०१९ साली सत्तेत आला, तरीही जीएसटी मंडळात काही बदल करण्यासाठी किमान तीन चतुर्थांश बहुमत त्यांच्याकडे असावं लागेल. या मंडळात राज्यांची भूमिका कळीची आहे. पण राज्य सरकारांनी साधारणतः जीएसटी स्वीकारलेला आहे, त्यासाठी महसूलात घट झाल्यास भरपाईचं आश्वासन केंद्र सरकारने दिलेलं आहे, अशा वेळी 'संघराज्यप्रणाली' हा निर्णायक घटक आधीच विरळ होऊ लागला आहे.

या तडजोडीमधून पर्यायी वास्तवाचं सूचन होतं– (रालोआतील) राजकारणी व धोरणकर्ते यांनाही जीएसटीच्या निष्पत्तीविषयी संदिग्धता वाटत असल्याचं दिसतं. अशा संदिग्धतेची झळ मतदारवर्गाला सोसावी लागते आणि त्यासंबंधीचा सक्षम पुरावा पुढे येणार नाही असा राजकीय संधिसाधूपणाही दाखवला जातो. निवडणुकांदरम्यानच्या वर्षांमध्ये महसूल संकलन वाढवण्याच्या नावाखाली लोकांवर अतिरिक्त भार थोपवला जातो. उदाहरणार्थ, जीएसटीची अंमलबजावणी व अंशदानातील घट यांमुळे जुलै २०१७पासून कुटुंबांना प्रति एलपीजी (लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस) सिलेंडरसाठी ३२ रुपये जास्तीचे मोजावे लागत आहेत. त्यानंतर निवडणुका आल्यावर कर 'सुसूत्रीकरणा'च्या नावाखाली किंमती कमी करण्यात आल्या. (जानेवारी २०१९पासून अंशदान नसलेल्या ग्राहकांसाठी एलपीजीच्या किंमती १२०.५० रुपयांनी कमी झाल्या तर अंशदान मिळणाऱ्या ग्राहकांना प्रति गॅस ५.९० रुपये कमी मोजावे लागत आहेत). दीड वर्ष अर्थव्यवस्थेला सक्तीने नियमपालन करायला लावल्यानंतर आता निवडणुका तोंडावर आल्यामुळे 'सुसूत्रीकरणा'ची आश्वासनं दिली जात आहेत. भारतासारखी बहुविधतापूर्ण अर्थव्यवस्था व राज्यव्यवस्था असलेल्या देशामध्ये जीएसटीची अंमलबजावणी करणं हे खरोखरच अवघड कार्य आहे. त्यामुळे, चूक व दुरुस्तीची प्रक्रिया स्वाभाविक आहे. या पार्श्वभूमीवर रालोआ सरकारचं धाडस व प्रयत्न या दोन्हींची प्रशंसा करायला हवी. पण, अशा प्रयोगांमागील राजकीय हेतूंचं काय?

गेल्या साधारण चार दशकांमध्ये विविध सरकारंनी जीएसटीसदृश करसुधारणांची अंमलबजावणी लांबणीवर टाकली. भारतीय लोकशाहीच्या प्रवाहाविरोधात जायला लागू नये, हा त्यामागचा हेतू होता. याउलट, रालोआ सरकारने (अप्रत्यक्ष) करसुधारणांची 'सर्वगुणकारी गोळी' म्हणून जीएसटीचा प्रचार केला आणि (घाईगडबडीत) त्याची अंमलबजावणीही केली, पण हा प्रचार आर्थिक सामान्य ज्ञानाला छेद देणारा आहे. किंबहुना, अनेक आश्वासित लाभ हे आर्थिक तर्काला धरून नाहीत– उदाहरणार्थ, जीएसटीमुळे करसंकलन वाढेल, चलनवाढीचा दर कमी होईल आणि आर्थिक वृद्धीचा दर वाढेल, इत्यादी दावे तर्कावर टिकणारे नाहीत. सर्वांना सारख्याच साच्यात पाहणाऱ्या रणनीतीबाबत रालोआने अनिश्चित बांधिलकी ठेवली आहे, यामागे भाजपचा छुप्या राजकीय व आर्थिक प्रभुत्वसत्तेचा हेतू असल्याचं दिसतं, हे जास्त धोकादायक आहे. लघुउद्योग हे कामकाज रचनेच्या पातळीवर मोठ्या उद्योगांचं लघुरूप असतात, हे गृहीतक पोकळ आहे. त्यामुळे असंघटित क्षेत्राला प्रतिबंधात्मक प्रशासकीय खर्चाचा प्रमाणाबाहेर ताण सहन करावा लागतो, तर त्या जोरावर संघटित क्षेत्राला विस्तारण्याची संधी मिळते. अशा परिस्थितीत उत्पन्न व रोजगार यांविषयीची असुरक्षितता वाढते.

अस्थिरता संपवण्याच्या निर्धारानुसार राजकीय पक्षाची इच्छाशक्ती वैध ठरते. वक्तृत्वाद्वारे नवीन कोडी निर्माण करून हे साधत नाही. जीएसटी मागे घेणं संभव दिसत नाही, अशावेळी राजकीय पक्षांना (रालोआप्रणित सत्ताधारी आघाडीला) आपल्या

राजकीय ग्राहकवर्गासाठी वक्तृत्वबाजी करणं गरजेचं वाटत असेल. परंतु, असं यश अस्थिर असतं. दीर्घ काळासाठी लोकांच्या कर्तृत्वाचा फायदा उठवायचा असेल, तर धोरणकर्त्यांना अधिक ठोस व सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारावा लागेल, त्यासाठी रचनात्मक त्रुटी दूर कराव्या लागतील, करप्रणाली व सवलती यासंबंधीचे योग्य मुद्दे शोधावे लागतील. हे सगळं करताना देशाच्या लोकशाहीचा डोलारा समतोल राहील, याची काळजी घ्यावी लागेल.

●

## खाजगी अवकाशात हस्तक्षेप करणारी पाळत

*गृह मंत्रालयाने अलीकडेच काढलेल्या सूचनापत्राकडे पाहिल्यावर आपल्याला लवकरात लवकर डेटा संरक्षण कायद्याची गरज का आहे, हे स्पष्ट होतं.*

गेल्या आठवड्यात गृह मंत्रालयाने एक अधिसूचना काढली आणि 'संगणकाद्वारे तयार केलेली, प्रक्षेपित केलेली, स्वीकारलेली वा साठवलेली कोणतीही माहिती' वाटेत अडवण्याचा, त्यावर देखरेख करण्याचा वा सांकेतिकतेची फोड करण्याचा (डिक्रिप्शन) अधिकार 'माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००' व त्याचे २००९ सालचे नियम यांद्वारे दहा सरकारी संस्थांना दिला. शिवाय, मध्यस्थांसाठी (व्हॉट्स-ॲप व टेलिग्राम यांसारखे संदेशन मंच) मार्गदर्शक तत्त्वांच्या बाबतीत २०११ सालच्या नियमांमध्ये दुरुस्त्या करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान अधिनियमात काही बदलही सरकार प्रस्तावित करणार असल्याची माहिती समोर आली आहे. समाजमाध्यमांवरील 'बेकायदेशीर' आशयाचं नियमन करण्याचा प्रस्ताव सरकार मांडणार आहे. इन्क्रिप्ट केलेल्या आशयाचीही 'शोधाशोध' करण्याचे अधिकार मध्यस्थ संस्थांनी सरकारला द्यावेत (म्हणजे दोन बाजूंनी इन्क्रिप्शन करण्याचा उद्देशच फोल ठरेल) आणि डेटा किती काळ साठवून ठेवता येईल याचा कालावधी वाढवावा, असा हा प्रस्ताव आहे. या सूचनापत्रानंतर हलकल्लोळ उडाल्यानंतर सरकारने नेहमीच्या सवयीने त्याला प्रतिसाद दिला- आधीच्या सरकारने केलेल्या कायद्यांचीच अंमलबजावणी आपण करत असल्याचा कांगावा भाजप सरकारने केला आहे.

के. पुट्टस्वामी खटल्यात २०१७ साली देण्यात आलेल्या खाजगीपणाविषयीच्या पथदर्शी निकालानंतर केवळ या सूचनापत्राचाच नव्हे, तर भारतातील पाळतीची चौकट आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम यांचाही पुनर्विचार गरजेचा आहे. इतकी वर्षं सरकार पाळत ठेवत नव्हतं किंवा संदेशांची शोधाशोध करत नव्हतं, असं नाही. भारतात दर महिन्याला नऊ हजार फोन 'टॅप' केले जातात, असं २०१४ सालच्या एका अहवालात नमूद केलेलं आहे. सरकारच्या सेंटर फॉर डेव्हलपमेन्ट ऑफ टेलिमॅटिक्स (सी-डॉट) या संस्थेने २०१३ साली सेंट्रल मॉनिटरिंग सिस्टम सुरू केली. २०१८च्या सुरुवातीला प्रकाशित झालेल्या सी-डॉट वार्षिक अहवालानुसार स्वयंचलित व्यापक पाळत प्रकल्पाची ही व्यवस्था असून 'व्यावहारिक पातळीवर पूर्ण' झालेली आहे.

लोकांचं जगणं डिजीटल माध्यमात इतकं मिसळून गेलेलं असताना, एखाद्या व्यक्तीचा संगणक किंवा फोन हा त्याच्या शरीराचाच एक अवयव बनला आहे. खुद्द सरकारच 'डिजीटल इंडिया'चा नारा देत असताना व्यक्तीच्या हिताचं रक्षण करणारा सक्षम डेटा संरक्षण कायदा अतिशय गरजेचा बनला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली केवळ राज्यसंस्थेच्या कृतींचं संरक्षण करणारे कायदे असू नयेत. किंबहुना, देशाच्या पाळतविषयक चौकटीची उभारणी करण्यासाठी वापरलेली सामग्री 'भारतीय तार अधिनियम, १८८५' आणि 'भारतीय

टपाल कार्यालय अधिनियम, १८९८' या कायद्यांमध्ये सापडते. माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६९मध्ये या वासाहतिक कायद्याचे केवळ प्रतिध्वनी उमटलेले दिसतात. डेटा/माहिती अडवण्याचा, त्यावर देखरेख ठेवण्याचा व त्यातील सांकेतिकतेची फोड करण्याचा अधिकार सरकारला कोणत्या परिस्थितीमध्ये असेल, हे या कलमात नमूद केलं आहे : भारताची सार्वभौमता व एकात्मता यांच्या हितासाठी, राज्यसंस्थेच्या सुरक्षेसाठी, परक्या देशांसोबतचे मैत्रीपूर्ण संबंध किंवा सार्वजनिक सुव्यवस्था टिकवण्यासाठी अथवा कोणत्याही दंडनीय गुन्ह्यासाठीची उत्तेजना रोखण्यासाठी, सरकार ही पावलं उचलू शकेल.

डेटा संरक्षणासंबंधीच्या बी. एन. श्रीकृष्ण समितीने नमूद केल्यानुसार, किमान पारदर्शकतेशिवाय पाळत ठेवली जाता कामा नये. ही पारदर्शकता पुट्टस्वामी खटल्यानुसार आवश्यकता, प्रमाणबद्धता व उचित प्रक्रिया यांची चाचणी पार करणारी असावी. पाळतीची आवश्यकता व प्रमाणबद्धता या संदर्भात खाजगीपणा व सुरक्षितता यांमधील वाद जुनाच आहे. परंतु, हा वाद एकांगी आहे. डेटा संरक्षण कायद्याचा अभाव असल्यामुळे व्यक्तीचा स्वतःच्या माहितीविषयीचा खाजगीपणा जपण्यासाठी पुरेशा सुरक्षिततेची अंमलबजावणी कशी करावी हा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी येत नाही. उचित प्रक्रियेचा विचार केला, तर डेटा संरक्षण अधिनियमासारखा काही दस्तावेज (उदाहरणार्थ, श्रीकृष्ण समितीने तयार केलेलं मसुदा विधेयक) प्रत्यक्षात येण्याची वाट आपल्याला पाहावी लागेल. दरम्यान, खरोखर पाळतीची प्रक्रिया कशा पद्धतीने कार्यरत आहे, हे आपल्याला सांगण्यास सरकार अनुत्सुक आहे. शिवाय, माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संदिग्ध अर्थाचे शब्द न्यायालयीन पर्यवेक्षणाशिवाय संपूर्ण प्रक्रियेलाच अपारदर्शक बनवतील. परंतु, आपलं सरकार एका मागोमाग एक कार्यकारी आदेश तेवढे देत सुटलं आहे, त्यामध्ये कोणत्याही कायदेशीर वा न्यायिक पर्यवेक्षणाला फाटा देण्यात आला आहे.

आवश्यकता, प्रमाणबद्धता व उचित प्रक्रियेच्या अटी प्रत्यक्षातील अंमलबजावणीदरम्यान बाजूला सारल्या जात आहेत. सरकार छुप्या पद्धतीने पाळतीच्या योजना मंजूर करायचा प्रयत्न करतं आहे. त्यामुळे सरकारमध्येच विश्वासाचा तुटवडा निर्माण झाला आहे. गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेवरून व्यक्त होत असलेला संताप याचाच निदर्शक आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली भारतातील सरकारांनी अनेक कायदे मंजूर केले आहेत आणि अनेक संशयास्पद अधिनियम लागू केले आहेत (आधार प्रकल्प आणि निश्चलनीकरणाचा खटाटोप, ही याची अलीकडची काही उदाहरणं). या कायद्यांद्वारे व्यक्तींच्या खाजगीपणामध्ये घुसखोरी वाटावी इतका हस्तक्षेप केला जातो. सरकार लोकांशी स्पष्टपणे व पारदर्शकपणे वागताना दिसत नाही.

भारतीय तार अधिनियम मंजूर झाल्यापासून संदेशन तंत्रज्ञानात आमूलाग्र बदल झाले आहेत. आधीपेक्षा कितीतरी जास्त लोकांशी आपण संदेशन साधत असतो. इंटरनेट माध्यमामुळे फोन व संगणक आता केवळ महत्त्वाच्या संदेशांची देवाणघेवाण करण्यासाठी किंवा वर्ड-प्रोसेसरवर काम करण्यासाठी वापरायची साधनं उरलेली नाहीत, तर आपल्या दैनंदिन अभिव्यक्तीचा व कामकाजाचा अविभाज्य भाग बनली आहेत. त्यामुळे, एखाद्या व्यक्तीचा फोन वा संगणक यांमध्ये शोधाशोध करणं किंवा देखरेख ठेवणं, हे आधीपेक्षा कितीतरी अधिक पटींनी व्यक्तिगत अवकाशात हस्तक्षेप करणारं ठरतं. आपण या उपकरणांच्या माध्यमातून बोलतो, वाचतो, काम करतो, बँकेचं कामकाज करतो, व्यक्त करतो, निषेध नोंदवतो आणि मतभिन्नताही नमूद करतो. त्याचप्रमाणे बेकायदेशीर कृत्यं आणि राष्ट्रीय सुरक्षेला असलेले धोकेही डिजिटल मार्गावर वाटचाल करू लागले आहेत. परंतु, या उपकरणांना व जाळ्यांना सर्वाव्यापी स्वरूपात अनिर्बंध प्रतिबंध घालणं किंवा त्यांवर पाळत ठेवणं, याचा अर्थ सरकारचं रूपांतर

'बिग ब्रदर'मध्ये होतं आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या पाळतविषयक चौकटीचा संपूर्ण कायापालट गरजेचा आहे. पुट्टस्वामी निकालपत्रात नमूद केलेल्या खाजगीपणाविषयीच्या तत्त्वांचं पालन व्हायला हवं आणि डेटा संरक्षण कायद्याची तत्काळ अंमलबजावणी आवश्यक आहे. ●

## तटस्थ नोकरशाहीची गरज आहे का?

*तटस्थपणामुळे प्रबुद्ध लोकाधिकाऱ्यांना पक्षपाती सरकारच्या गुंतागुंतीच्या संरचनेतून पलायन करायला मदत होते.*

ऐंशीहून अधिक निवृत्त नोकरशहांनी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेलं खुलं पत्र अनेक कारणांमुळे महत्त्वाचं ठरतं. एक, भारतीय राज्यघटनेच्या आदर्श तत्त्वांना संदर्भबिंदू मानून हे पत्र लिहिण्यात आलं आहे. राज्यघटनेद्वारे आदेश मिळावेत, अशी कटिबद्धता त्यात नमूद करण्यात आली आहे. लोकाधिकारी हे राजकारण्यांचे किंवा राज्यघटनेच्या नैतिक अधिसत्तेशिवाय इतर कोणत्याही अधिकारीसंस्थेचे गुलाम नसतात, हे या पत्रात दाखवून देण्यात आलं आहे. दोन, प्रस्थापित सरकारचे पक्षपाती हितसंबंध आणि इतरांना मानहानीकारक असुरक्षिततेमध्ये ढकलू पाहणाऱ्या विशिष्ट सामाजिक गटांचे बाह्य हेतू, या दोन घटकांपासूनचं स्वातंत्र्य तटस्थतेच्या तत्त्वामध्ये अनुस्यूत असतं. चुकणाऱ्या सरकारला- प्रस्तुत संदर्भात उत्तर प्रदेश सरकारला जाब विचारून किमान आपल्या चिंता व्यक्त करण्याइतकी सक्रिय भूमिका तरी लोकाधिकाऱ्यांनी पार पाडण्याची गरज आहे, हे या पत्राच्या प्रेरणेवरून स्पष्ट होतं. नोकरशाहीची विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी ही भूमिका कळीची आहेच; शिवाय, जमावी हिंसेच्या सततच्या भयछायेखाली जीवन कंठणाऱ्या सामाजिक गटांना दिलासा देण्यासाठी सामाजिकदृष्ट्या सहानुभूतीपूर्ण व्यवहार प्रशासनाकडून व्हावा यासाठीही ही भूमिका महत्त्वाची आहे.

एकाधिकारशाहीच्या वाढत्या संकटामुळे राज्यघटनेशी कटिबद्ध असलेली नोकरशाही कधी नव्हे एवढी प्रस्तुत ठरणार आहे. तीन, माथेफिरू जमावी हिंसेच्या उदयाला अप्रत्यक्ष चालना देणाऱ्या सरकारच्या अपयशाकडे या पत्रातून निर्देश करण्यात आला आहे आणि नोकरशाही-उत्तर समाजाविषयीची चर्चा अप्रस्तुत ठरवली आहे. भारतामध्ये आपल्याला राज्यघटनेशी कटिबद्ध असलेली नोकरशाही गरजेची आहे. नाही का? विचारसरणी आणि राजकारण या संदर्भांमध्ये नोकरशाही तटस्थ असते. शेवटी, सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, निवृत्तीनंतरही लोकाधिकारी उदात्त उद्देशांनी महत्त्वाचे हस्तक्षेप करू शकतात, औपचारिक राजकारणाचा विशिष्ट टिळा न लावताही त्यांना चांगल्या समाजासाठी आवश्यक कृती करता येतात. भयापासून मुक्ती आणि मानवी प्रतिष्ठा यांसारख्या घटनादत्त तत्त्वांची फारशी फिकीर न करणाऱ्या औपचारिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवह लोकाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, राजकीय पक्षांमध्ये दाखल झालेल्या निवृत्त लोकाधिकाऱ्यांनी द्वेष व मानखंडना यांविरोधात ठोसपणे उभी राहाणारी आपली आदर्श भूमिका घेतलेली नाही, हे उपरोल्लेखित पत्रातून दाखवण्यात आलं आहे.

अस्सल लोकाधिकाऱ्याच्या बाबतीत घटनात्मक तत्त्वाविषयीची कटिबद्धता आयुष्यभरासाठी लागू असतेच, पण त्याहून अधिक महत्त्वाचं म्हणजे कोणत्याही राजकीय वा विचारसरणीय मध्यस्थीशिवाय या कटिबद्धतेचं पालन करता येतं. न्यायाचं घटनात्मक तत्त्व, राजकारण वा विचारसरणी यांच्याशी नोकरशाहीने संपर्क ठेवावाच लागतो असं नाही. अशा वेळी शांतता, सौहार्द व न्याय यांच्याबाबत कटिबद्ध राहण्याची

नोकरशाहीची क्षमता किती आहे, याचं प्रमाण राज्यघटना ठरवते. राजकारण व विचारसरणी यांच्या मदतीशिवाय सामाजिकदृष्ट्या परिणामकारक राहू शकेल अशी तिसरी व तटस्थ संज्ञा नोकरशाही पुरवते. लिंगभाव व सामाजिक बहुविधतेच्या पातळीवर संशयास्पद भूमिका असणाऱ्या पक्षांमध्ये सामील झालेल्या किंवा तसा विचार करत असलेल्या लोकाधिकाऱ्यांनी या पक्षांमधील आपल्या प्रवेशाची सार्वजनिक वैधता सिद्ध करायला हवी. सेवेत असतानाची त्यांची कामगिरी घटनात्मक आदर्शांना कितपत मानणारी होती, याचा दाखलाही त्यांनी देणं अपेक्षित आहे. संशयास्पद सामाजिक पूर्वेतिहास असलेले राजकीय पक्ष अशा अधिकाऱ्यांना औपचारिक राजकारणामध्ये प्रवेश देताना अशा प्रकारचा कोणताही दाखला मागत नाही, त्यामुळे ही आजची नैतिक निकड बनली आहे. आपल्या काही लोकाधिकाऱ्यांना त्यांची जात/पितृसत्ता आणि तीव्र द्वेषभावना कार्यालयीन अवकाशाबाहेर ठेवणं जमलेलं नाही, या संदर्भात असे दाखले मागणं जास्तच गरजेचं आहे. भारतातील नोकरशाहीची रचना नोकरशाही मनाच्या जातीने दबलेली आहे. प्रशासकीय संक्रमणामध्ये एखाद्या व्यक्तीची जात ही बदलीच्या कागदपत्रांपेक्षाही वेगाने पुढच्या ठिकाणी पोचलेली असते. जात, लिंगभाव, प्रदेश, धर्म व भाषा यांच्यावर आधारित भेदभावाच्या कहाण्या नियमितपणे समोर येत असतात.

लोकाधिकाऱ्यांनी दोन परस्परसंबंधित नैतिक कार्यं करणं अपेक्षित असतं. एक, ते ज्या राज्यसंस्थेचा भाग असतात तिला नागरी समाजातील नाराज घटकांकडून बाधा पोचू नये वा ती क्षीण होऊ नये यासाठी या राज्यसंस्थेचं संरक्षण करणं. दोन, जात व पितृसत्ताक जाणिवेने ग्रस्त झालेल्या समाजाच्या विध्वंसक प्रयत्नांना प्रतिबंध करणं. अशा प्रकारचा समाज आक्रमक संदिग्धतावादामध्ये कोसळणार नाही, यासाठी नोकरशाहीला सार्वजनिक जीवनामध्ये हस्तक्षेप करावा लागतो. एका बाजूला, ही दुहेरी कार्यं पार पाडण्यासाठी लोकाधिकाऱ्यांमध्ये प्रस्थापित सरकारच्या घटनाविरोधी हितसंबंधांना प्रतिकार करण्याची नैतिक क्षमता असावी लागते. तर, दुसऱ्या बाजूला, लोकांच्या दैनंदिन समस्याग्रस्त सामाजिक व्यवहारांना समजून घेण्यासाठी या घटनात्मक तत्त्वांचं उपयोजन करणारा सक्रिय हस्तक्षेपही त्यांच्याकडून अपेक्षित असतो. या संदर्भात हे अधिकारी एका सार्वत्रिक वर्गाचा भाग असतात, कारण सभ्य व शांततापूर्ण समाज प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नामध्ये योगदान देणं हा त्यांचा सार्वत्रिक हितसंबंध असतो. या वर्गाच्या सदस्यांना केवळ नोकरशाहीचं प्रभुत्व टिकवून ठेवण्यात रस नसतो, तर सामाजिक संबंधांच्या भयंकर पायामध्ये बदल घडवण्यासाठी, आणि या संबंधांची अधिक सभ्य मार्गाने पुनर्रचना करण्यासाठी व्यापक भूमिका पार पाडणं ही त्यांची जबाबदारी असते. शांततापूर्ण मध्यस्थी, मनमिळवणी व सल्लामसलत यांद्वारे सामाजिक संबंधांमधील वैमनस्य काढून टाकण्याची क्षमता त्यांच्यात असते. अशा वर्गाच्या सार्वत्रिकतेला एखाद्या विशिष्ट हितसंबंधाच्या ध्यासामुळे छेद जातो. त्यामुळे उपरोल्लेखित पत्रामध्ये सुचवण्यात आलेलं तटस्थतेचं तत्त्व हे लोकाधिकाऱ्यांना प्रस्थापित सरकारचा गुलाम होण्यापासून प्रतिबंध करणारं नैतिक कार्य पार पाडत असतं.

●


परिवर्तनाचा वाटसरू

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा
संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा
युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# ‘रालोआ’ची लिंगभाव न्यायाची संकल्पना

*तिहेरी तलाक विधेयक गडबडीत मंजूर करण्याच्या सरकारच्या कृतीचं समर्थन करणं चुकीचं होईल.*

लोकसभेमध्ये ‘मुस्लीम महिला (विवाह अधिकार संरक्षण) विधेयक, २०१८’ मंजूर करून घेण्याच्या शूर कामगिरीबद्दल राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकार समाधानी असल्याचं दिसतं. अनेकांना ही तशी पुरोगामी कृती वाटू शकेल. पण केवळ सकृत्दर्शनी पवित्र्याचं समर्थन करणं चुकीचं ठरेल. उदाहरणार्थ, हे विधेयक संसदीय निवड समितीकडे पाठवण्यास सरकारने नकार दिला, हे सल्लामसलतीच्या व कायद्याशी संबंधित सर्व घटकांना सहभागी करून घेण्याच्या लोकशाही तत्त्वाविरोधात जाणारं आहे. बारा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांवर बलात्कार करणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा व्हावी यासाठीचा वटहुकूम काढताना सरकारने बलात्कारींशी सल्लामसलत केली नव्हती, असा केंद्रीय कायदा मंत्र्यांनी या संदर्भात केलेला युक्तिवाद अतिशय विचित्र आहे. तिहेरी तलाक विधेयकाअंतर्गत आरोपी ठरलेल्यांना फौजदारी गुन्हेगार ठरवणारी तरतूद समस्याग्रस्त आहे. लग्न हा एक नागरी करार असतो, त्यामुळे या कराराचा भंग झाल्यास नागरी स्वरूपाची कारवाई व्हायला हवी, परंतु प्रस्तुत विधेयकाने हा अ-जामीनपात्र दंडनीय गुन्हा ठरवला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २०१८ साली दिलेल्या निकालाला प्रतिसाद म्हणून आपण हे विधेयक मांडल्याचा सरकारने केलेला युक्तिवाद अपुरा आहे. तलाकचा प्रश्न वैयक्तिक कायद्याशी व धार्मिक प्रथेशी संबंधित आहे, त्यामुळे त्यासंबंधी सरकारने कायदा करावा, अशी सूचना अल्पमतातील निकालामध्ये केलेली होती. मुस्लीम महिलांना न्याय मिळावा अशी सरकारला खरोखरच चाड असती, तर तलाकला नियमबद्ध करावं आणि विवाह मोडण्याची न्याय्य प्रक्रिया विकसित करावी यासाठी एका काँग्रेस खासदाराने मांडलेल्या वैयक्तिक विधेयकाचा विचार सरकारने केला असता. स्त्रियांच्या गटांनी केलेल्या मागण्या, व्यापक चर्चा व्हावी यासाठी काही गटांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका, या कशाचीच दखल न घेता सरकारने न्यायाविषयीची अनास्था दाखवली आणि तलाकचं प्रकरण फौजदारी कक्षेत आणण्याचा एककल्ली आटापिटा केला.

बहुमतातील निकालाने तिहेरी तलाकची प्रथा घटनाबाह्य आणि/किंवा इस्लामबाह्य ठरवली असताना तिहेरी तलाकला फौजदारी कक्षेत आणायची गरज काय? विरोधी पक्षांच्या खासदारांनी आणि मुस्लीम महिलांसोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी नमूद केल्यानुसार, तिहेरी तलाकला फौजदारी कक्षेत आणणाऱ्या या विधेयकात संबंधित महिलेच्या व तिच्या कुटुंबियांच्या उपजीविकेबाबत मात्र मौन पाळण्यात आलेलं आहे. त्यामुळे मुस्लिम महिलांच्या कल्याणाचा आपल्याला कळवळा आहे, हा सरकारचा दावा फोल ठरतो. तिहेरी तलाकला फौजदारी कक्षेत आणण्यापेक्षा कौटुंबिक हिंसाचारामध्ये त्याचा समावेश करून २००५ सालच्या कौटुंबिक हिंसा कायद्याच्या कक्षेत तलाकचा समावेश करणं शक्य होतं. विवाहित स्त्रियांना निराधार सोडून देण्याची समस्या सर्वच धर्मांमध्ये आहे, त्यावर तोडगा काढण्यासाठी हे पाऊल उपयोगी पडलं असतं. प्रस्तुत विधेयकामध्ये मुस्लीम पुरुषाने दिलेल्या तिहेरी तलाकला फौजदारी कक्षेखाली आणलं आहे, परंतु मुस्लिमेतर पुरुषाने पत्नीला सोडलं तर त्यासंबंधी अशी दंडनीय तरतूद नाही. कायद्यासमोर समानतेच्या वैश्विक तत्त्वाला यातून छेद जातो, कारण मुस्लिमेतर स्त्रियांच्या बाबतीत अन्याय्य स्थिती कायम ठेवलेली आहे.

मुळात लिंगभावात्मक न्यायाचं संरक्षण करणं, हा सरकारचा हेतू असता तर हे सर्व प्रश्न विचारात घेतले गेले असते. सरकारचा हेतू कायमच संशयाच्या भोवऱ्यात होता, कारण सत्ताधारी पक्ष व त्याची मातृसंस्था असलेला

संघ परिवार यांची विचारसरणी व व्यवहार यांनी सातत्याने पितृसत्ताक मूल्यांचं समर्थन केलं आहे. भीमराव रामजी आंबेडकर यांनी १९५१ साली तयार केलेल्या हिंदू कोड बिलाला हिंदुत्ववादी शक्तींकडून आणि संघ परिवाराकडून कठोर विरोध झाला होता. मा. स. गोळवलकर यांनी वैयक्तिक कायद्यातील सुधारणेला केलेला विरोधही असाच होता. तिहेरी तलाक विधेयक लिंगभाव न्यायाशी संबंधित आहे, पण साबरिमालाचा प्रश्न परंपरेशी संबंधित आहे, असा युक्तिवाद पंतप्रधान नरेंद्र मोदी करतात, तेव्हा हिंदू परंपरा लिंगभाव न्यायाचं तत्त्व पायदळी तुडवत असल्या तरी टिकवाव्यात, असं त्यातून सूचित होत असतं. अशा प्रकारच्या राजकीय शक्ती स्त्रियांच्या अधिकारांना उचलून धरतील, ही शक्यताच अस्थिर पायावर उभी आहे. शिवाय, मुस्लिमांवर अत्याचार, अप्रतिष्ठा व हिंसा लादणाऱ्या या शक्ती मुस्लिम महिलांना संकटातून बाहेर काढतील हा दावा पोकळ आहे. २००२ साली गुजरातमध्ये झालेल्या दंगलीत सर्वांत क्रूर अत्याचार मुस्लिम महिलांविरोधात झाले. हे पुरेसं नाही म्हणूनच की काय, तत्कालीन राज्य सरकारच्या कृपेने हिंदुत्ववादी शक्तींनी अपराध्यांना पाठीशी घातलं, आणि त्यांचं गौरवीकरणही केलं.

विद्यमान सरकारच्या व सत्ताधारी पक्षाच्या गतकामगिरीची आणि हेतूंची अशी छाननी करणं अत्यावश्यक झालं आहे, कारण आपण मुस्लीम समुदायामध्ये सामाजिक सुधारणा घडवत असल्याचा आव त्यांनी आणला आहे. दुसऱ्या बाजूला मुस्लिमांना पद्धतशीररित्या लक्ष्य करणाऱ्या जमावी हिंसेच्या कृतींना हेच सरकार पाठीशी घालतं आहे आणि मुस्लीम समुदायातील असुरक्षिततेची व भयाची भावना अधिक गडद होत चालली आहे. आज अल्पसंख्याक समुदायांना घेरून असलेल्या सामाजिक असुरक्षिततेच्या वातावरणात सामाजिक सुधारणांसाठी उचललेली पावलं परिणामकारक ठरणार नाहीत. परंतु, असुरक्षिततेची अस्सल भावना वापरून सामाजिक सुधारणांना खीळ घालणाऱ्या अखिल भारतीय मुस्लीम वैयक्तिक कायदा मंडळासारख्या संस्थांच्या प्रयत्नांनाही विरोध व्हायलाच हवा. समुदायाबाहेरून सुधारणा घडवण्याची गरज थांबवायला हवी. अर्थात, अशा सुधारणांसाठी पावलं उचलण्याची नैतिक क्षमता कोणाकडे आहे, याचे वैध निकषही तपासायला हवेत. अशी तपासणी केली असता विद्यमान सरकार व सत्ताधारी पक्ष यांचं पारडं अतिशय हलकं असल्याचं दिसतं.

●

---

## कामगारांची संघटनाबांधणी अराजकीय?

*‘न-राजकीय’ कामगार संघटना त्रस्त कामगारवर्गासाठी काहीच करू शकत नाही.*

भारतातील कामगार संघटनांसमोर दोन प्रकारची आव्हानं आहेत आणि समकालीन परिस्थितीत ही बहुधा सर्वांत बिकट आव्हानं ठरतील. ढासळती रोजगाराची अवस्था व कार्यपरिस्थिती, यांच्यासोबतच सरकारच्या ‘कामगार सुधारणां’नाही सामोरं जायची वेळ कामगार संघटनांवर आली आहे. या सुधारणा अजिबातच कामगारस्नेही नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कामगार शाखा असलेल्या ‘भारतीय मजदूर संघ’ या संघटनेने ‘भारतीय कामगार संघटनांच्या राष्ट्रीय आघाडी’शी (काँग्रेसशी संलग्न असलेल्या भारतीय राष्ट्रीय कामगार संघटनेपासून फुटून ही संस्था निर्माण झाली) जवळीक करून ‘कॉन्फेडरेशन ऑफ सेंट्रल ट्रेड युनियन्स’ (कॉन्सेन्ट) ही शिखर संस्था स्थापन केली आहे. कॉन्सेन्ट ही ‘न-राजकीय’ कामगार संघटना आहे, असं भारतीय मजदूर संघाने प्रसारमाध्यमांना सांगितलं, हे विशेषच म्हणावं लागेल. या नवीन संघटनेच्या स्थापनेतून काही

महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. एक, आत्ताच्या घडीला अशी आघाडी आत्यंतिक निकडीची होती का? दोन, कामगार व त्यांच्या संघटनांसमोरचे विद्यमान प्रश्न व संदिग्धता यांच्यावरील उपाय देशातील व्यापक व गंभीर राजकीय परिस्थितीपेक्षा वेगळे काढून पाहता येतील का? कॉन्सेन्टचा भाग नसलेल्या इतर दहा केंद्रीय कामगार संघटनांनी 'कामगार संघटना अधिनियम, १९२६'मध्ये दुरुस्ती करायच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावाला कठोर विरोध केला आहे. ही दुरुस्ती राजकीय हेतूने होत असून संघटनांना मान्यता देण्याच्या प्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाला यातून मोकळीक मिळेल, असं विरोधकर्त्या संघटनांनी म्हटलं आहे. परंतु, प्रस्तुत दुरुस्तीला विरोध करणाऱ्या संघटनांमध्ये भारतीय मजदूर संघाचा समावेश नाही. कॉन्सेन्ट व प्रस्तावित दुरुस्ती यांच्यामागे निष्ठूर वास्तव पसरलेलं आहे.

देशातील केवळ आठ टक्के श्रमशक्ती औपचारिक क्षेत्रात आहे. अनौपचारिक क्षेत्रात असलेल्या उर्वरित ९२ टक्के श्रमशक्तीच्या कामाच्या व जगण्याच्या परिस्थितीकडे संघटनांनी आणि सरकारनेही लक्ष देण्याची गरज आहे. अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांचं संघटन करण्यामध्ये अनेक अडथळे आहेत. असा वेळी कॉन्सेन्टची स्थापना कितपत मदतीची ठरेल? श्रम क्षेत्राच्या रचनेतच अनेक वेगवान व अलीकडच्या काळात तर आमूलाग्र बदल झाले आहेत. विस्तारत्या अनौपचारिक क्षेत्रात तरुण-तरुणींचं व स्त्रियांचं प्राबल्य आहे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने रोजगाराचे अनन्य प्रश्न उपस्थित केले आहेत, आणि वाहतूक क्षेत्रात जवळपास एका रात्रीत बदल घडल्याने खाजगी टॅक्सीचालक (विशेषतः ओला व उबेर कंपन्यांशी संलग्न चालक) कधी नव्हे अशा समस्यांना सामोरं जात आहेत. बहुतांश सरकारी कंपन्यांना वेळोवेळच्या सरकारांच्या राजकीय हस्तक्षेपाशी संघर्ष करावा लागला, पण कामगारांना व संघटनांना त्यांच्याशीच संबंधित प्रश्नांवर (उदाहरणार्थ, पॅकेजचं पुनरुज्जीवन) चर्चेसाठी मात्र कधीच बोलावण्यात आलं नाही. 'निश्चित कालावधीच्या रोजगाराचं' कंत्राट आता जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये लागू झालेलं आहे. २०१६ साली कापडनिर्मिती क्षेत्रात अशा रोजगार रचनेला परवानगी देण्यात आली. व्यवसायसुलभता निर्माण व्हावी आणि रोजगारदात्यांना 'लवचीक' धोरण अवलंबता यावं, हा यामागचा उद्देश असल्याचं सांगितलं जातं. निश्चित कालावधीचा रोजगार देणाऱ्या कंत्राटांच्या नियमांनुसार, कामाचा कालावधी कितीही असला तरी संबंधित कामगाराला केवळ कंत्राटावर घेतलं जातं (आठवड्याभरापासून ते एखाद्या प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीसाठी कामगार कार्यरत राहिला, तरीही हाच नियम लागू होतो). शिवाय, कंत्राटी कामगारांना काढून टाकताना कोणत्याही पूर्वसूचनेची गरज राहात नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांसह अनेक कंपन्यांनी १९७०च्या दशकापासून संपूर्ण विभागांमध्ये कंत्राटी पद्धत लागू करायला सुरुवात केली, तेव्हापासून कामगार संघटना या अरिष्टाशी झुंजत आहेत.

आता विद्यमान कामगार संघटनांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे आणि नवीन संकटांना हाताळण्याची त्यांची क्षमता दुर्बल होऊ लागली आहे, अशा वेळी देशातील राजकीय परिस्थितीव्यतिरिक्त कोणत्या रितीने ही समस्या सोडवणार? खरं तर, भारतीय मजदूर संघानेही निश्चित कालावधीच्या कंत्राटांचा निषेध केलेला आहे आणि विविध कामगार कायद्यांना 'वेतन नियम विधेयक, २०१७'मध्ये कोंबण्याच्या सरकारच्या प्रयत्नांनाही संघाने विरोध केला. थेट परकीय गुंतवणुकीवर अवलंबून राहाणाऱ्या सरकारने श्वेतपत्रिका काढून रोजगारनिर्मितीच्या सद्यस्थितीचा आढावा मांडावा, अशीही मागणी या संघटनेने केली आहे.

नरेंद्र मोदी सरकारच्या कामगारविरोधी धोरणांवर भारतीय मजदूर संघाने यापूर्वी उघड टीका केली होती, पण सप्टेंबर २०१५पासून मात्र महत्त्वाच्या राष्ट्रव्यापी निदर्शनांमध्ये इतर संघटनांना साथ देण्यास संघाने नकार

दिलेला दिसतो. आपण केवळ कामगारांच्या कल्याणासाठी लढतो, ‘राजकारण करण्यावर आपला विश्वास नाही,’ त्यामुळे आपण सार्वत्रिक संपांमध्ये सहभागी होत नाही, असं कारण संघाने दिलं आहे.

कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाला सरकारने गांभीर्याने घ्यावं आणि अर्थपूर्ण संवाद साधावा यासाठी सरकारवर दबाव आणण्याचंही आव्हान संघटित कामगार वर्गाच्या चळवळीसमोर आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार कामगार संघटनांबरोबर चर्चा करायलाही तयार नाही, असं अनेक कामगार नेत्यांनी म्हटलेलं आहे.

कामगार क्षेत्रासंबंधीच्या सुधारणा या बंदी व दुरुस्तीला कारणीभूत ठरून लोकशाही अधिकारांवर गदा आणणाऱ्या ठरतात, हे दाखवून देऊन कामगार वर्गाचे प्रश्न हे व्यापक सार्वजनिक प्रश्नाचाच भाग बनवण्याचं गुंतागुंतीचं व महाकाय कार्य कामगार संघटनांना करावं लागेल. हे करण्यासाठी पुरोगामी राजकीय व सामाजिक चळवळींशी संवाद साधणं गरजेचं आहे. रोजगारहीन आर्थिक वृद्धी साधली जात असल्यामुळे सदस्यत्वाची समस्याही भारतीय कामगार संघटनांना भेडसावते आहे. संसदेमध्ये किंवा संसदेबाहेर कामगार धोरणांवर चर्चा वा सल्लामसलत करण्यास सरकारने हट्टीपणे नकार दिला आहे, अशा वेळी आपले प्रश्न लोकांपर्यंत घेऊन जाणं आणि सामूहिक सौदेबाजीचं महत्त्व अधोरेखित करणं या व्यतिरिक्त दुसरा पर्याय कामगार संघटनांसमोर उरत नाही. यासाठी त्यांनी शासन व राजकीय प्रश्न हाताळणं गरजेचं असतं. कॉन्सेन्टची भूमिका या रचनेत कोणती असेल? ●

## कॅटोविस परिषदेमध्ये गमावलेली संधी

*हवामान बदलावरील उपायांमध्ये अजूनही समतेच्या अभिवचनाचा विचार होताना दिसत नाही.*

मानवनिर्मित हवामान बदलाचा प्रश्नच डोनाल्ड ट्रम्प यांनी नाकारला आणि ब्राझील व भारत यांनी आपल्या अनिच्छुक भूमिका कायम ठेवल्या, त्यामुळे पोलंडमधील कॅटोविसमध्ये झालेल्या हवामानविषयक शिखरबैठकीत खरा तोडगा निघण्याची शक्यताच नव्हती. बहुप्रवाहीत्वाच्या पराभवमालिकेमध्ये ही आणखी एक भर म्हणावी लागेल. दोन आठवड्यांच्या वादावादीनंतर जवळपास २०० देशांनी कार्बन उत्सर्जनासंबंधीच्या १३३ पानांच्या नियमपुस्तिकेवर स्वाक्षऱ्या केल्या. जागतिक तापमानवाढ दोन अंश सेल्सियसच्या खाली ठेवण्यासंदर्भात २०१५ साली पॅरिसमध्ये झालेल्या कराराच्या अंमलबजावणीसाठी ही नियमपुस्तिका तयार करण्यात आली आहे.

‘कॅटोविस क्लायमेट चेन्ज पॅकेज’ अशा अधिकृत नावाने प्रकाशित झालेल्या या पुस्तिकेमध्ये, विविध देशांनी आपापल्या हरितवायू उत्सर्जनावर कशी देखरेख ठेवावी आणि त्याची माहिती कशी द्यावी याचा तपशील नोंदवलेला आहे. शिवाय, हे उत्सर्जन कमी करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करत आहोत, हेही देशांनी या नियमपुस्तिकेनुसार नोंदवणं अपेक्षित आहे. मुळात, या संदर्भात अंमलबजावणीची कोणतीही यंत्रणाच नाही, असा युक्तिवाद काही शंकासूर करू शकतात. उत्सर्जनकपातीचं लक्ष्य देशांना गाठता आलं नाही, तर काय होतं? पण अलीकडच्या काळात ऊर्जा कार्यक्षमतेच्या बाबतीत बरेच प्रयत्न होत आहेत आणि जीवाश्म इंधनापासूनही दूर जाण्यासाठीची पावलं उचलली जात आहे, हे लक्षात घ्यायला हवं. जागतिक अंमलबजावणीची यंत्रणा नसली तरीही जागतिक सकल घरेलू उत्पन्नाच्या वाढीव टक्केवारीसाठी लागणारी ऊर्जा १९९०पासून सरासरी ३२ टक्क्यांनी कमी झाली आहे. प्रगत अर्थव्यवस्थांपेक्षाही उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये हे प्रमाण जास्त कमी झालं आहे. बदल घडणं शक्य

आहे, हे यावरून लक्षात येतं. तंत्रज्ञान किंवा योग्य यंत्रणा तयार करणं, हे खरं आव्हान नसून राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये समता राखणं खऱ्या अर्थाने आव्हानात्मक आहे. म्हणजे सगळं शेवटी राजकारणावर येऊन ठेपतं!

समतेच्या मुद्द्याचं अधिक स्पष्टीकरण व्हावं, यासाठी आपण हरितवायू उत्सर्जनावरील मर्यादेचं उदाहरण घेऊ शकतो. समजा, जागतिक तापमानवाढ दोन अंश सेल्सियसहून अधिक होऊ नये यासाठी वातावरणातील हरितवायूंची जी मर्यादा ठरवली असेल तिला जगाच्या सद्य लोकसंख्येनं भागून किती आकडा येतो, तो गृहीत धरला. मग जागतिक हरितवायू उत्सर्जनामध्ये प्रत्येक देशाच्या योगदानाची मर्यादा ठरवण्यासाठी हा आकडा वापरला. तर, अनेक प्रगत देश मुळातच या मर्यादेच्या बरेच वर गेलेले असतील, कारण त्यांनी शेकडो वर्षं औद्योगिकीकरण अनुभवलेलं आहे. त्यांना उत्सर्जन इतक्या प्रमाणात कमी करावं लागेल की शेवटी त्यांच्या जीडीपीमध्येही घट होईल. दुसऱ्या बाजूला, उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना मात्र विस्तारण्यासाठी बराच अवकाश मिळेल. या निर्धारित मर्यादेमध्ये साटंलोटं करण्याची मुभा ठेवली तर श्रीमंत राष्ट्रांकडून गरीब राष्ट्रांकडे संपत्तीचं हस्तांतरण होईल. परिणामी, एका दगडात दोन पक्षी साधता येतील.

याउलट, नवीन उत्सर्जनाची मर्यादा दोन अंश सेल्सियसहून कमी ठेवण्यासाठी नवीन आकडा गृहीत धरला, आणि त्याला लोकसंख्येने भागून मग प्रत्येक देशाची वार्षिक उत्सर्जन मर्यादा ठरवली, तर काय होईल? वाढती लोकसंख्या असलेल्या सर्वांत गरीब देशांना ऊर्जावापरातील वाढीला मोठा चाप लावावा लागेल, आणि घटती लोकसंख्या असलेल्या श्रीमंत देशांना ऊर्जावापराचा अधिक अवकाश लाभेल, शिवाय ऊर्जा कार्यक्षमतेमधील गुंतवणूकही वाढत जाईल. दृढमूल विषमतेच्या बदल्यात हवामानबदलाची समस्या सोडवण्यासारखा हा प्रकार असेल. कॅटोविसमधील निष्पत्ती याच्या जवळपास जाणारी आहे. नवीन उत्सर्जनमर्यादेची लक्ष्य ठरवणारी रूपरेषा त्यात निश्चित करण्यात आली. राष्ट्रीय विषमतांचा आविष्कार करणं आणि त्या वाढवणं यांचा एक नवीन मार्ग म्हणून हवामानबदलाचे करार वापरले जात आहेत.

कॅटोविसमध्ये समतेचा मुद्दा तीन मार्गांनी हाताळण्यात आला आहे. एक, विकसनशील देशांची उत्सर्जनमर्यादेची लक्ष्यं विकसित देशांपेक्षा थोडी दीर्घ मुदतीची आहेत, परंतु विकसनशील व विकसित यांच्यातील सीमारेषा ठरवण्यावरून वाद सुरू राहील याची तजवीजही करण्यात आली आहे. आपल्याला विकसनशील देश मानावं, असा युक्तिवाद तुर्कस्तानाने कॅटोविसमध्ये केला. दोन, उत्सर्जनमर्यादेच्या लक्ष्यांची देवाणघेवाण करता येईल, अशीही तरतूद या वेळी करण्यात आली. तीन, विकसनशील देशांसाठी वर्षाकाठी १०० अब्ज डॉलरांचा 'हवामानविषयक वित्तपुरवठा' कॅटोविस परिषदेमध्ये निर्धारित करण्यात आला.

दुर्दैवाने, विकसनशील देशांसाठी ही मदत तुरळकच ठरणार आहे. गेल्या वर्षी अॅटलान्टिकमधून आलेल्या चक्रीवादळाने १०० अब्ज डॉलरांहून अधिक नुकसान केलं होतं. कार्बनविषयक देवाणघेवाण यंत्रणा उभारण्यात आलेली नाही, त्यामुळे गरीब देशांना नव्हे तर श्रीमंत देशांनाच या रचनेचा फायदा होईल. ऐतिहासिक असमानता कायम राहील. भूतकाळामध्ये श्रीमंत देश वातावरणात हरितवायू सोडून श्रीमंत झाले, पण आज विकसनशील देशांच्या अशाच कृतींबाबत मात्र ते तक्रारीचा सूर लावतात.

जागतिक ऊर्जा कार्यक्षमतेमधील सुधारणेतून दुसरीच बाजू समोर येते. 'प्रदूषणकर्ता किंमत मोजेल' या तत्त्वानुसार आणि कार्बन कराच्या माध्यमातून उत्सर्जनामध्ये कपात करण्याची इच्छा व क्षमता अनेक राष्ट्रांनी दाखवली आहे. हरितवायू उत्सर्जनाच्या आंतरराष्ट्रीय अतिरिक्ततेवर उपाय करणं, हा मुद्दा आहे. राष्ट्रीय कर महसूल देशांच्या सीमा पार करून जात नाही. हवामानबदलाच्या अतिरिक्ततेचे परिणाम विशिष्ट भूभागांवर जास्त केंद्रित

झालेले आहेत आणि कमी सखल असलेल्या किनारपट्टीच्या भागांमध्ये व बेटांवर राहणाऱ्यांवर त्याचा अवाजवी भार पडतो. तापमान वाढणारे समुद्र, भयंकर वादळं आणि वाढती समुद्री पातळी, यांचा हा परिणाम आहे. या भागांमधील लोकांना आज हवामानबदल अनुभवावा लागतो आहे, पण कॅटोविसमध्ये यावर विशेष लक्ष देण्यात आलेलं नाही.

समुद्रकिनारी राहणाऱ्यांना आणि इतरांच्या हवामानविषयक कृतीमुळे हानी सहन कराव्या लागणाऱ्या लोकांना भरपाई देण्यासाठी सर्व राष्ट्रीय उत्सर्जन करांवर २० टक्के आंतरराष्ट्रीय अधिभार लावून कदाचित यावर उपाय साधता येईल.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (२९ डिसेंबर २०१८ व ५ जानेवारी २०१९ या अंकांतून)

(कॅटोवीस परिषदेसंबंधीचे संपादकीय अविनाश परसूद यांनी लिहिलं आहे. मलेरियापासून मुक्ती या विषयावर टोमिनिकाच्या पंतप्रधानांचे विशेष सल्लागार असलेले परसूद हे लंडन व मुंबईस्थित एलारा कॅपिटल या संस्थेचे संस्थापक आहेत : apersaud@me.com)

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक नांदेडमध्ये मिळण्याचे ठिकाण**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉंप्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक अकोल्यामध्ये मिळण्याचे ठिकाण**

हरिष बुक स्टॉल

न्यू बस स्टँड, अकोला
भ्र. ९८२२२३३२६४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर,
प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक जळगावमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५